# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.

## दिनांक २२.०२.२०२३

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि. २१/०२/२०२३ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या २५३ वाहन चालका विरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचे कडुन २,०६,६००/— रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

**दारूबंदी सदराखाली विशेष मोहित अंतर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैध दारू विक्री अंतर्गत दि. २१/०२/२०२३ रोजी दारूबंदी कायदया अंतर्गत हिंगोली जिल्हयामध्ये एकुण ०६ ठिकाणी छापा मारूण कार्यवाही करून आरोपीतांनकडुन ६७.०५ लिटर दारू असा एकुण १६,३६०/—रू.किमतीचा मुददेमाल जप्त करण्यात आला असुन आरोपीतां विरूध्द दारूबंदी कायदयाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**गुटखा बंदी सदराखाली विशेष मोहित अंतर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये दि. २१/०२/२०२३ रोजी पोस्टे हिंगोली शहर येथे कलम ३२८,२७२,२७३,१८८ भादवी सह कलम २६(२)(प),२६(२)(पअ),२७(२)(म),३०(२)(अ),५९ अन्नसुरक्षा व मानके अधि अन्वये ०२ गुन्हे नोंद करण्यात आले असुन यातील नमुद आरोपीने महाराष्ट्र शासनाने प्रतिबंध केलेला गुटखा व मानवी जिवीतास धोका असलेले पान मसाले विक्री करण्याच्या उददेशाने स्वताचे ताब्यात बाळगतांना मिळुन आला म्हणुन गुन्हा दाखल करण्यात आला आहे व पुढील तपास हिंगोली शहर पोलीस करित आहेत.

**वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि २१/०२/२०२३ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकाविरूध्द २८३ मोवाका अन्वये एकुण १० ठिकाणी कार्यवाही करण्यात आली.